# मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग
जा.क्र.मनपा/आस्था/६९५/२०२१-२२
दि.२४/०६/२०२१

## -: प्रत्यायोजन आदेश:-

वाचा :- जा.क्र.मनपा/आस्था/६८८/२०२१-२२, दि.२२/०६/२०२१ रोजीचा आदेश.

ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिय तरतुदीनुसार, आयुक्त यांना प्रदान केलेले किंवा त्यांच्याकडे सोपविलेले किंवा त्यामध्ये निहीत असलेले कोणतेही अधिकारी, कर्तव्ये किंवा कामे ही उक्त अधिनियमातील कलम ६९ नुसार अन्य कोणत्याही महानगरपालिका अधिकारी यांना प्रदान करता येतात आणि,

ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील कलम ६९ नुसार अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका उप-आयुक्त यांनी, आयुक्त आपले अधिकार व कर्तव्यांपैकी वेळोवेळी त्यांच्याकडे सोपविल अशा अधिकाराचा वापर केला पाहिजे व अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत,

त्याअर्थी, कोणत्याही कामांच्या निविदा उघडणे, निगोशिएशन करणे इ. कामांसाठी प्रस्तुत कामकाज नियंत्रण पालन व निर्णय घेण्याकरिता खालील अधिकाऱ्यांची निविदा समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | समिती पदनाम |
|---|---|---|
| १. | अतिरिक्त आयुक्त | अध्यक्ष |
| २. | उप-आयुक्त (मुख्यालय) | सदस्य |
| ३. | शहर अभियंता | सदस्य |
| ४. | मुख्यलेखापरिक्षक | सदस्य |
| ५. | मुख्य लेखाधिकारी | सदस्य |
| ६. | संबंधित खातेप्रमुख | सदस्य सचिव |

**प्रस्तुत समितीची कार्यकक्षा (व्याप्ती)**

नियुक्त समितीची कार्यकक्षा (व्याप्ती) खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

१) जा.क्र.मनपा/सा.प्र./१३८१/२०१६-१७, दि.१९/११/२०१६ रोजीच्या आदेशाचे पालन व्हावे.

२) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग III/उद्योग-४ दि.०१/१२/२०१६ ची सुधारित नियमपुस्तिका शासनाच्या वेब पोर्टलवर शासन निर्णय प्राप्त करुन त्यानुसार कार्यवाही करावी.

३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व निविदा अटीशर्ती अंतिम करणे तसेच प्रचलित निविदा प्रणाली मधून अटीशर्ती बाबत माहिती घेऊन कार्यवाही करण्यात यावी.

४) वेळोवेळी पारित होणारे शासन निर्णय व मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणे.

सबब, मी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका या आदेशान्वये वरीलप्रमाणे निविदा समितीची नेमणूक करीत असुन निविदा संदर्भात त्यांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका



Scanned with CamScanner

प्रत :-

१) अतिरिक्त आयुक्त
२) उपायुक्त (सर्व)
३) शहर अभियंता
४) खाते प्रमुख / विभाग प्रमुख (सर्व)
५) मुख्य लेखा अधिकारी
६) मुख्य लेखा परीक्षक
७) आदेश नस्ती

यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- माहितीस्तव,

१) मा.महापौर
२) मा.उप-महापौर
३) मा.सभापती, स्थायी समिती
४) मा.सभागृह नेता
५) मा.विरोधी पक्ष नेता
६) मा.सभापती, परिवहन समिती



Scanned with CamScanner